# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोंकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website : http://jdhepanvel.org दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५ ३८२०

क्र. विसस/उशि/कोंविप/मशि/२०२०/ १३६१ दिनांक : ०५/११/२०२०

प्रति,

प्राचार्य,

कणकवली शिक्षण प्रसारक मंडळाचे,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

कणकवली जि.सिंधुदुर्ग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता तासिका तत्वावरील पदे भरण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत...

संदर्भ : १. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३, दि. १४/११/२०१८.

२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, यांचे पत्र क्र. युएनआय/(२६/१६)/अधी-३/विशि-१/१८८४८, दि. १४/११/२०१८.

३. आपले पत्र क्र. वम/१४९/२०२०-२१, दि. १५/१०/२०२०.

उपरोक्त संदर्भीय क्र. १ च्या शासन निर्णयान्वये अनुदानित महाविद्यालयातील रिक्त पदे तासिका तत्वावरील अध्यापकांची नियुक्ती करण्यापुर्वी या कार्यालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने आपले संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये तासिकातत्वावरील पदे भरण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्राच्या केलेल्या मागणीस अनुसरुन खालीलप्रमाणे तासिका तत्वावर पदे भरण्यास या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | विषय | अनुज्ञेय पदे | सद्यस्थितीत कायरत असलेले नियमित अध्यापक | सद्यस्थितीत रिक्त पदे | तासिका तत्वावर नेमणूक करावयाची अध्यापकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | इंग्रजी | २ | २ | ० | २ शिल्लक कार्यभारानुसार |
| २. | हिंदी | २ | १ | १ | २ |
| ३. | इतिहास | २ | १ | १ | १ शिल्लक कार्यभारानुसार |
| ४. | अर्थशास्त्र | २ | १ | १ | १ शिल्लक कार्यभारानुसार |
| ५. | राज्यशास्त्र | ० | ० | ० | १ शिल्लक कार्यभारानुसार |
| ६. | समाजशास्त्र | ० | ० | ० | १ शिल्लक कार्यभारानुसार |
| ७. | रसायनशास्त्र | ५ | १ | ४ | ४ |
| ८. | पदार्थविज्ञान | १ | ० | १ | १ |
| ९. | सुक्ष्मजीवशास्त्र | ४ | ० | ४ | २ |
| १०. | वाणिज्य | २ | १ | १ | २ |
| ११. | बीझनेस इकॉनॉमिक्स | १ | ० | १ | २ |
| १२. | ग्रामीण विकास | ३ | १ | २ | २ |

Kankavli College, Kankavli
Inward No. 50
Date - 11 NOV 2020

TRUE COPY

Principal
Kankavli College

Est. ... R.B. ... to note & take necessary action

उपरोक्त तासिका तत्वावरील पदे भरण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. आपण सादर केलेल्या कार्यभारानुसार वरीलप्रमाणे ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येत असून सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र तासिका तत्वावरील पद भरेपर्यंत तसेच भरल्यानंतरही कोणत्याही वेळी कार्यभार कमी झाल्यास संबंधीत अध्यापकांची नेमणूक करु नये.
२. संस्थेनी विद्यापीठाची मान्यता घेऊन जाहिरात देऊन विद्यापीठ अनुदान आयोग/शिखर संस्था/शासन यांनी वेळोवेळी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रताधारक अध्यापकांची स्थानिक निवड समितीमार्फत निवड करावी. ज्यामध्ये संस्थाप्रमुख, प्राचार्य, विभाग प्रमुख व एक बाह्य विषय तज्ज्ञ असावा.
३. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. त्यामुळे तासिका तत्वावरील अध्यापकांची जास्तीत जास्त ९ महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात यावी. त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्यात यावी. शैक्षणिक वर्ष संपताच सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ९ महिने किंवा संबंधित अध्यापकांनी प्रत्यक्ष शिकविलेल्या तासिका यापैकी जे कमी असेल त्यानुसार मानधन अदा करण्यात येईल.
४. तासिका तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त नाहीत, त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी/ नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही, तसेच त्यास एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करता येईल. असे हमीपत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संबंधित अध्यापकाकडून रुजु होतेवेळी घेण्यात यावे.
५. तासिका तत्वावरील कोणत्याही उमेदवारास एकाच महिन्यात त्याच्या दर्जाच्या अनुज्ञेय वेतनश्रेणीतील सुरुवातीच्या वेतनश्रेणीच्या रक्कमेपेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही, याची जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची/संस्थेची राहील. संदर्भ क्र. १ दि. १४/११/२०१८ शासन निर्णयातील सूचनांनुसार त्यांना मानधन देय राहील.
६. प्रत्यक्ष उपलब्ध कार्यभारानुसार आणि तासिका तत्वावरील मानधन अदायगीबाबत काही अनियमितता आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य /संस्थेची राहील.
७. महाविद्यालयात कार्यरत पूर्णवेळ अध्यापकांना तासिका तत्वावरील दिलेली अतिरिक्त नियुक्ती मान्य केली जाणार नाही.
८. एक पूर्णवेळ रिक्त पदाकरीता फक्त दोनच तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणुका करता येतील. एका अध्यापकाकडे जास्तीत जास्त ०९ तासिकांचा कार्यभार सोपविता येईल.
९. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग दि. १४ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतुदी महाविद्यालय/संस्था व संबंधीत अध्यापकांस बंधनकारक राहतील.
१०. दि. १ ऑक्टोबर, च्या विद्यार्थीसंख्येवा आधारीत कार्यभार निश्चित करण्यात येतो. त्यामुळे आपण मागणी केल्यानुसार उपरोक्त प्रमाणे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले असले तरी सदर विषयास दि. १ ऑक्टोबर, २०२० च्या विद्यार्थीसंख्येवर आधारीत कार्यभार उपलब्ध असल्यासच संबंधीत अध्यापकांचे वेतन अनुदान निर्धारणावेळी मान्य करण्यात येईल. त्यामुळे आपल्या मागणीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले असले तरी संबंधीत विषयास दि. १ ऑक्टोबर, २०२० च्या विद्यार्थीसंख्येवर आधारीत कार्यभार उपलब्ध होण्याची शक्यता असेल तरच संबंधीतांची नियुक्ती करण्यात यावी.
११. तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांचे हजेरी पत्रक स्वतंत्र ठेवून अनुदान निर्धारणाच्या वेळी तपासणीस उपलब्ध करुन द्यावे.
१२. ज्या विषयाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, त्या विषयाचा दि. १ ऑक्टोबर, २०२० रोजीचा कार्यभार तक्ता सादर करावा.
१३. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव ही अत्यंत तात्पुरत्या केलेली उपाययोजना असल्याने, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार पुर्णवेळ नियमित पदभरतीसाठी व्यवस्थापनाने प्रयत्न करावेत.

**TRUE COPY**

Principal
Kankavli College

(डॉ. संजय जगताप)
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल